Pune Police

# प्रेसनोट दि. १४/११/२०१७

## खूनाच्या प्रयत्नातील गुन्हयातील चार आरोपींना गुन्हे शाखा, युनिट १ ने केली अटक

दिनांक १३/११/२०१७ रोजी पो.हवा. रिजवान जिनेडी व पो शि प्रशांत गायकवाड, यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, खडकी पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या **खुनाच्या प्रयत्न** यातील गुन्हयामध्ये पाहिजे असलेले आरोपी नामे १.अजय हनुमंत अलगुडे, वय २२, धंदा व्यवसाय, रा प्लॉट नं ११, रेल्वे स्टेशन जवळ, शिवाजीनगर, पुणे, २. प्रशांत संजय शेट्टी, वय १९, धंदा शिक्षण, रा किर्लोस्कर कंपनीजवळ, पारिजात सोसा., फ्लॅट नं डी २०१, बोपोडी, पुणे, ३. गणेश शंकर बनकर, वय २१, धंदा मजुरी, रा प्लॉट नं ११, रेल्वे स्टेशन जवळ, शिवाजीनगर, पुणे, ४. मनोज मंगेश परबळकर, वय २०, धंदा नोकरी, रा. प्लॉट नं ११, रेल्वे स्टेशन जवळ, शिवाजीनगर, पुणे हे लोणावळा, तालुका - मावळ, जिल्हा - पुणे येथे लपून बसलेची बातमी मिळालेने, मा. वरीष्ठांचे परवानगीने लागलीच गुन्हे शाखा, युनिट १ कडील स्टाफने लोणावळा येथे जावुन, बातमीदाराच्या सहाय्याने, वरिल चार ही इसमांना लोणावळा रेल्वे स्टेशनचे बाजुस ताब्यात घेतले.

त्यांना गुन्हे शाखा पुणे शहर कार्यालयामध्ये आणुन, विश्वासात घेवून त्याचेकडे दाखल गुन्हयाबाबत विचारणा केली असता, जखमी इसम नामे अरिफ कमरुद्दीन शेख, रा पी एम सी कॉलणी, शिवाजीनगर, पुणे याने दिंनांक २/११/२०१७ रोजी वरील नमुद इसमांपैकी प्रशांत संजय शेट्टी याचेवर वार करून, त्यास जखमी केले होते. त्याकारणा वरून वरील नमुद इसम यांनी दिनांक १०/११/२०१७ रोजी रात्रौ १०.०० वा चे सुमारास अरिफ कमरुद्दीन शेख यास लाथा बुक्यांनी मारहाण करून, त्याचेवर चाकुने वार करून, त्यास जिवे मारण्याचा प्रयत्न केला आहे म्हणून खडकी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २६२/२०१७ भादविक. ३०७,३४२,३२३,५०४,५०६,१४७,१४८ अन्वये गुन्हा दाखल आहे. नमुद इसमास पुढील योग्य त्या कारवाई कामी खडकी पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात येत आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे सो., पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख सो. सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पोलीस उप-निरीक्षक हर्षल कदम, पो उप निरी दिनेश पाटील स.पो.फौज. राजाराम सुर्वे, पो.हवा. रिजवान जिनेडी, प्रशांत गायकवाड, श्रीकांत वाघवले, पो.ना. तुषार खडके, इरफान मोमीन, इम्रान शेख, सचिन जाधव, पो.हवा. राजू पवार, प्रकाश लोखंडे, उमेश काटे, अशोक माने, महेबुब मोकाशी, सुभाष पिंगळे, गजानन सोनुने, मोहन येलपले, यांनी केली आहे.

